ए-वन् इंग्लिश टीचर

— आत्माराम शेटये एम ए



सेंट्रल प्रकाशन, मुंबई

मूळापासून इंग्रजी शिकणारांसाठी

ए-वन इंग्लिश टीचर

A-1 ENGLISH TEACHER

व्याकरण, रचना, पत्रलेखन, व्यावहारिक
माहिती व शब्दकोषासह

(भाग १ ते २४)

: लेखक :

श्री. आत्माराम सी. शेट्ये,
एम्. ए., एस्. टी. सी., एच्. एच्. एस्.

सेंट्रल प्रकाशन, मुंबई ४

प्रकाशक :


एफ्. बी. बुरहाणपूरवाला
सेंट्रल प्रकाशन,
सिंप्लेक्स बिल्डींग, पाववाला स्ट्रीट,
गिरगांव, मुंबई–४.

आवृत्ति तिसरी : जुलै १९६९

मुद्रक :

शरद कृ. सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस,
त्रिभुवन रोड, गिरगांव, मुंबई ४

अनुक्रमणिका


NORTH
NORTH-WEST
NORTH-EAST
WEST
EAST
SOUTH-WEST
SOUTH-EAST
SOUTH
MONSOON
WINTER
SUMMER
SEPTEMBER
OCTOBER
AUGUST
NOVEMBER
JULY
DECEMBER
JUNE
JANUARY
MAY
FEBRUARY
APRIL
MARCH
30
31
30
31
31
31
30
31
31
28 29
30
31
ONE YEAR
THE SUN
THE MOON
DAYS OF THE WEEK
SUNDAY . MONDAY . TUESDAY . WEDNESDAY
THURSDAY . FRIDAY . SATURDAY

A

a

A

a

APPLE

ॲपल

सफरचंद

अे



B

b

B

b

BOY

बॉय

मुलगा

बी



C

c

C

c

CAT

कॅट

मांजर

सी



D

d

D

d

DOG

डॉग

कुत्रा

डी



E

e

E

e


EAGLE

ईगल

गरूडपक्षी

ई



F	f	FOX	
	F	फॉक्स	
	f	कोल्हा	
G	g	GIRL	
	G	गर्ल	
	g	मुलगी	
H	h	HEN	
	H	हेन	
	h	कोंबडी	
I	i	INK	
	I	इंक	
	i	शाई	
J	j	JUG	
	J	जग	
	j	चंबू	

K

K *K* *k*

KITE

काईट

पतंग



L

l *L* *l*

LAMP

लॅंप

दिवा



M

M *M* *m*

MANGO

मॅंगो

आंबा



N

n *N* *n*

NEST

नेस्ट

घरटे



O

O *O* *o*

OX

ऑक्स

बैल



V.

P	p	PARROT	पी
	P	पॅरट	
	p	पोपट	
Q	q	QUEEN	क्यू
	Q	क्वीन	
	q	राणी	
R	r	RAT	आर्
	R	रॅट	
	r	उंदीर	
S	s	SWAN	एस्
	S	स्वान	
	s	हंस	
T	t	TABLE	टी
	T	टेबल	
	t	टेबल	











V.

U	U	UMBRELLA	
	U	अंब्रेला	
	u	छत्री	
V	V	VASE	
	V	व्हेस	
	v	फुलदाणी	
W	W	WATCH	
	W	वॉच	
	w		
X	X	X'MAS	
	X	क्स्मास	
	x	ख्रिस्टमस	
Y Z	Y *y*		
		योक झू	
	y Z	ZEBRA	
	z	झिब्रा झेब्रा	




ONE   वन   एक



TWO   टू   दोन



THREE   थ्री   तीन



FOUR   फोर   चार



FIVE   फाइव्ह   पांच



SIX   सिक्स   सहा



SEVEN   सेव्हन   सात




EIGHT   एट   आठ




NINE   नाइन   नऊ



TEN   टेन   दहा



SERPENT
RABBIT
LOTUS
SUNFLOWER
SHEEP
PIG
STEAMER
BRINJAL
RADDISH
BANANA
AEROPLANE
GIRAFFE
DONKEY
ROSE
MARIGOLD
COCK


LION
TIGER
ELEPHANT
DEER
BEAR
WOLF
BUTTER-FLY
CROW
OSTRICH
KING-FISHER
DOVE
MONKEY
RHINOCEROS
TORTOISE
CAMEL
ZEBRA
KANGAROO

ए-वन् इंग्लिश टीचर

धडा पहिला

ए बी सी डी परिचय

प्रास्ताविक,

मित्रहो, आजपासून आपण एक नवी भाषा शिकणार आहोत. त्या भाषेचं नाव 'इंग्रजी.' इंग्रजी ही आधुनिक युगातील अतिशय समृद्ध अशी भाषा आहे. ती शिकल्यामुळे ज्ञानाच्या अनेकविध शाखांमध्ये सहज संचार करणे आपणांस शक्य होईल.

चला तर, देवाचे नाव घेऊन आणि गुरुजनांचे स्मरण करून आपण इंग्रजीचं अध्ययन सुरू करूया.

प्रथम ए बी सी डी आदि मूळाक्षरांची ओळख करून घेतली पाहिजे. त्यासाठी आपल्या हातातील पुस्तकाच्या नावाकडे पहा.

काय नाव आहे त्याचं ! 'ए-वन् इंग्लिश टीचर.' होय ना ! या पुस्तकाच्या ह्या नावातील 'ए' हे अक्षर आहे ना ते इंग्रजीमध्ये 'A' असं लिहितात व 'a' असंही लिहितात. म्हणजे अक्षर एकच पण आकार मात्र दोन. त्यापैकी पहिला आकार जो आहे त्याला 'कॅपिटल' म्हणजे मोठा म्हणायचं व दुसऱ्याला 'स्मॉल' किंवा लहान असं म्हणायचं.

या लिपीला 'रोमन' लिपी असं नाव आहे.

याशिवाय 'ए' हे अक्षर आणखीही दोन प्रकारे लिहितात. ते लिहिण्याच्या पद्धतीला 'इटॅलिक' लिपी असं म्हणतात. ही धावती लिपी होय. तिच्यामध्ये देखील कॅपिटल व स्मॉल असा भेद आहेच. ही लिपी विशेषतः लेखनासाठी व वर सांगितलेली रोमन लिपी पुस्तके छापण्यासाठी उपयोगात आणतात.

आता वर सांगितलेली माहिती नीट ध्यानात यावी म्हणून सोबतची आकृती पहा बरं.

इंग्रजी लिप्या व अंक

A	a	*A*	*a*	ए
B	b	*B*	*b*	बी
C	c	*C*	*c*	सी
D	d	*D*	*d*	डी
E	e	*E*	*e*	ई
F	f	*F*	*f*	एफ्
G	g	*G*	*g*	जी
H	h	*H*	*h*	एच्
I	i	*I*	*i*	आय्
J	j	*J*	*j*	जे
K	k	*K*	*k*	के
L	l	*L*	*l*	एल्
M	m	*M*	*m*	एम्

1	2	3	4	5
वन्	टु	थ्री	फोर	फाइव्ह

इंग्रजी लिप्या व अंक

N	n	*N*	*n*	एन्
O	o	*O*	*o*	ओ
P	p	*P*	*p*	पी
Q	q	*Q*	*q*	क्यू
R	r	*R*	*r*	आर्
S	s	*S*	*s*	एस्
T	t	*T*	*t*	टी
U	u	*U*	*u*	यू
V	v	*V*	*v*	व्ही
W	w	*W*	*w*	डब्ल्यू
X	x	*X*	*x*	एक्स्
Y	y	*Y*	*y*	वाय्
Z	z	*Z*	*z*	झेड्
6 सिक्स्	7 सेव्हन्	8 एट्	9 नाइन्	10 टेन्

सोबतच्या आकृतीकडे पाहिलंत ? किती अक्षरं आहेत तिथं ? नीट मोजा.

ए, बी, सी, डी, इ, एफ्, जी, एच्, आय्, जे, के, एल्, एम्, एन्, ओ, पी, क्यू, आर्, एस्, टी, यू, व्ही, डब्ल्यू, एक्स, वाय् व शेवटचं अक्षर झेड्. म्हणजे एकूण २६ अक्षरं झाली. ह्या २६ अक्षरांवरच इंग्रजी भाषेची सारी शब्दरचना उभी आहे.

आता थोडे आकडे अभ्यासू.

आपल्या पुस्तकाच्या नावातील 'वन्' हा आकडा कसा लिहितात पहा बरं. '1' 'वन्' असा. ह्या 'वन्'चा अर्थ होतो 'एक'.

याचप्रमाणं पुढील आकडे पाहू.

	2	टू	म्हणजे	दोन
	3	थ्री	,,	तीन
	4	फोर्	,,	चार
	5	फाइव्ह	,,	पाच
	6	सीक्स्	,,	सहा
	7	सेव्हन्	,,	सात
	8	एट्	,,	आठ
	9	नाईन्	,,	नऊ
व	0	झीरो	,,	शून्य

म्हणजे एक ते नऊपर्यंत नऊ आकडे व दहावं शून्य. ह्या दहा चिन्हांनी आपण हवी तेवढी संख्या लिहू शकतो.

याचा अर्थ, इंग्रजी भाषेतील सव्वीस मूळाक्षरं व दहापर्यंतचे आकडे आपल्या परिचयाचे झाले. आता पृष्ठ ११ वरील आकृतीकडे पहा. इंग्रजी अक्षरे व त्यांचे उच्चार समजण्यासाठी ही आकृती नीट अभ्यासा. पुढे शब्द बनवतांना तिचा फार उपयोग होईल. आता या सर्व माहितीच्या आधारे आपण मराठी मूळाक्षरं व बाराखड्या इंग्रजीमध्ये कशा लिहिता येतील ते पाहूया.

प्रथम मूळाक्षरं व स्वर घेऊ.

(इंग्रजी अक्षरे व त्यांचे उच्चार)

अक्षराचे नाव	तिरतिराळे उच्चार	अक्षराचे नाव	तिरतिराळे उच्चार
अे	अ, आ, अॅ, ऑ, ए	एन्	न्, ण्
बी	ब्	ओ	ओ, ऑ, अ, उ
सी	क् स्	पी	प्.
डी	ड्, द्	क्यू	क्, क्व्
ई	ए, ई, अ	आर्	र्
एफ्	फ्	एस्	स्, ज्, झ्
जी	ग्, ज्	टी	त्, ट्
एच्	ह्	यू	अ, उ, य्
आय्	इ, आय्, अ	व्ही	व्ह्, व्
जे	ज्	डब्ल्यू	व्, ऊ
के	क्	एक्स्	क्स् क्झ् •
एल्	ल्, ळ्	वाय	य्
एम्	म्	झेड्	झ्

मराठी स्वर—इंग्रजीमधून

अ	आ	इ	ई	उ	ऊ
A	A	I	EE	U	OO
ए	ऐ	ओ	औ	अं	अः
E	AI	O	AU	AM	Aha

मराठी मुळाक्षरे

क	ख	ग	घ	ङ
Ka	Kha	Ga	Gha	N
च	छ	ज	झ	ञ
Cha	Chha	Ja	Jha	N
ट	ठ	ड	ढ	ण
Ta	Tha	Da	Dha	Na
त	थ	द	ध	न
Ta	Tha	Da	Dha	Na
प	फ	ब	भ	म
Pa	Pha	Ba	Bha	Ma

य	र	ल	व
Ya	Ra	La	Va
श	ष	स	ह
Sha	Shha	Sa	Ha

ळ	क्ष	ज्ञ
La	Ksha	Dnya

आणि ह्यानंतर मराठी बाराखडी क का पासून ज्ञ ज्ञा पर्यंत.

मराठी—इंग्रजी बाराखड्या

क	का	कि	की	कु	कू	के	कै	को	कौ	कं	कः
ka	ka	ki	kee	ku	koo	ke	kai	ko	kau	kam	kah
ख	खा	खि	खी	खु	खू	खे	खै	खो	खौ	खं	खः
kha	kha	khi	khee	khu	khoo	khe	khai	kho	khau	kham	khah
ग	गा	गि	गी	गु	गू	गे	गै	गो	गौ	गं	गः
ga	ga	gi	gee	gu	goo	ge	gai	go	gau	gam	gah
घ	घा	घि	घी	घु	घू	घे	घै	घो	घौ	घं	घः
gha	gha	ghi	ghee	ghu	ghoo	ghe	ghai	gho	ghou	gham	ghah
ङ	ङा	ङि	ङी	ङु	ङू	ङे	ङै	ङो	ङौ	ङं	ङः
na	na	ni	nee	nu	noo	ne	nai	no	nau	nam	nah
च	चा	चि	ची	चु	चू	चे	चै	चो	चौ	चं	चः
cha	cha	chi	chee	chu	choo	che	chai	cho	chau	cham	chah
छ	छा	छि	छी	छु	छू	छे	छै	छो	छौ	छं	छः
chha	chha	chhi	chhee	chhu	chhoo	chhe	chhai	chho	chhou	chham	chhah
ज	जा	जि	जी	जु	जू	जे	जै	जो	जौ	जं	जः
ja	ja	ji	jee	ju	joo	je	jai	jo	jau	jam	jah

झ	झा	झि	झी	झु	झू	झे	झै	झो	झा	झं	झः
jha	jha	jhi	jhee	jhu	jhoo	jhe	jhai	jho	jhau	jham	jhah
ञ	ञा	ञि	ञी	ञु	ञू	ञे	ञै	ञो	ञौ	ञं	ञः
na	na	ni	nee	nu	noo	ne	nai	no	nau	nam	nah
ट	टा	टि	टी	टु	टू	टे	टै	टो	टौ	टं	टः
ta	ta	ti	tee	tu	too	te	tai	to	tau	tam	tah
ठ	ठा	ठि	ठी	ठु	ठू	ठे	ठै	ठो	ठौ	ठं	ठः
tha	tha	thi	thee	thu	thoo	the	thai	tho	thau	tham	thah
ड	डा	डि	डी	डु	डू	डे	डै	डो	डौ	डं	डः
da	da	di	dee	do	doo	de	dai	do	dau	dam	dah
ढ	ढा	ढि	ढी	ढु	ढू	ढे	ढै	ढो	ढौ	ढं	ढः
dha	dha	dhi	dhee	dhu	dhoo	dhe	dhai	dho	dhau	dham	dhah
ण	णा	णि	णी	णु	णू	णे	णै	णो	णौ	णं	णः
na	na	ni	nee	nu	noo	ne	nai	no	nau	nam	nah
त	ता	ति	ती	तु	तू	ते	तै	तो	तौ	तं	तः
ta	ta	ti	tee	tu	too	te	tai	to	tau	tam	tah
थ	था	थि	थी	थु	थू	थे	थै	थो	थौ	थं	थः
4ha	tha	thi	thee	thu	thoo	the	thai	tho	thau	tham	thah

द	दा	दि	दी	दु	दू	दे	दै	दो	दौ	दं	दः
da	da	di	dee	du	doo	de	dai	do	dau	dam	dah
ध	धा	धि	धी	धु	धू	धे	धै	धो	धौ	धं	धः
dha	dha	dhi	dhee	dhu	dhoo	dhe	dhai	dho	dhau	dham	dhah
न	ना	नि	नी	नु	नू	ने	नै	नो	नौ	नं	नः
na	na	ni	nee	nu	noo	ne	nai	no	nau	nam	nah
प	पा	पि	पी	पु	पू	पे	पै	पो	पौ	पं	पः
pa	pa	pi	pee	pu	poo	pe	pai	po	pau	pam	pah
फ	फा	फि	फी	फु	फू	फे	फै	फो	फौ	फं	फः
pha	pha	phi	phee	phu	phoo	phe	phai	pho	phau	pham	phah
ब	बा	बि	बी	बु	बू	बे	बै	बो	बौ	बं	बः
ba	ba	bi	bee	bu	boo	be	bai	bo	bau	bam	bah
भ	भा	भि	भी	भु	भू	भे	भै	भो	भौ	भं	भः
bha	bha	bhi	bhee	bhu	bhoo	bhe	bhai	bho	bhau	bham	bhah
म	मा	मि	मी	मु	मू	मे	मै	मो	मौ	मं	मः
ma	ma	mi	mee	mu	moo	me	mai	mo	mau	mam	mah
य	या	यि	यी	यु	यू	ये	यै	यो	यौ	यं	यः
ya	ya	yi	yee	yu	yoo	ye	yai	yo	yau	yam	yah
र	रा	रि	री	रु	रू	रे	रै	रो	रौ	रं	रः
ra	ra	ri	ree	ru	roo	re	rai	ro	rau	ram	rah

ल	ला	लि	ली	लु	लू	ले	लै	लो	लौ	लं	लः
la	la	li	lee	lu	loo	le	lai	lo	lau	lam	lah
व	वा	वि	वी	वु	वू	वे	वै	वो	वौ	वं	वः
wa	wa	wi	wee	wu	woo	we	wai	wo	wau	wam	wah
श	शा	शि	शी	शु	शू	शे	शै	शो	शौ	शं	शः
sha	sha	shi	shee	shu	shoo	she	shai	sho	shau	sham	shah
ष	षा	षि	षी	षु	षू	षे	षै	षो	षौ	षं	षः
sha	sha	shi	shee	shu	shoo	she	shai	sho	shau	sham	shah
स	सा	सि	सी	सु	सू	से	सै	सो	सौ	सं	सः
sa	sa	si	see	su	soo	se	sai	so	sau	sam	sah
ह	हा	हि	ही	हु	हू	हे	है	हो	हौ	हं	हः
ha	ha	hi	hee	hu	hoo	he	hai	ho	hau	ham	hah
ळ	ळा	ळि	ळी	ळु	ळू	ळे	ळै	ळो	ळौ	ळं	ळः
la	la	li	lee	lu	loo	le	lai	lo	lau	lam	lah
क्ष	क्षा	क्षि	क्षी	क्षु	क्षू	क्षे	क्षै	क्षो	क्षौ	क्षं	क्षः
ksha	ksha	kshi	kshee	kshu	kshoo	kshe	kshai	ksho	kshau	ksham	kshah
ज्ञ	ज्ञा	ज्ञि	ज्ञी	ज्ञु	ज्ञू	ज्ञे	ज्ञै	ज्ञो	ज्ञौ	ज्ञं	ज्ञः
dnya	dnya	dnyi	dnyee	dnyu	dnyoo	dnye	dnyai	dnyo	dnyau	dnyam	dnyah

धडा दुसरा

शब्द व त्यांच्या जाती

मागील धड्यात आपण इंग्रजी मुळाक्षरे शिकलो व त्याचबरोबर काही आकड्याचीही ओळख करून घेतली. आता, या धड्यात आपणांस शब्दांच्या जाती ज्याला इंग्रजीत 'दि पार्टस् ऑफ स्पीच' (The parts of speech) म्हणतात–समजून घ्यावयाच्या आहेत.

मराठीप्रमाणे इंग्रजी भाषेतदेखील शब्दांच्या आठ जाती आहेत. त्या पुढीलप्रमाणे—

1	A	Noun	ए नाऊन्	नाम
2	A	Verb	ए व्हर्ब्	क्रियापद
3	A	Pronoun	ए प्रोनाऊन्	सर्वनाम
4	An	Adjective	ॲन् ॲड्जेक्टिव्ह	विशेषण
5	An	Adverb	ॲन् ॲड्व्हर्ब्	क्रियाविशेषण
6	A	Conjunction	ए कंजंक्शन	उभयान्वयी अव्यय
7	A	Preposition	ए प्रेपोझिशन	शब्दयोगी अव्यय
8	An	Interjection	ॲन् इंटर्जेक्शन	केवलप्रयोगी अव्यय

(१) सर्व प्रथम **नाम** किंवा **नाऊन्** (Noun)

कुठल्याही व्यक्तीचा, वस्तूचा अथवा कल्पनेचा उल्लेख करण्याकरिता जो शब्द वापरतात त्याला **नाम** असे म्हणतात. उदाहरणार्थ:—

1 A Book ए बुक् = पुस्तक
2 A Hook ए हुक् = खिळा
3 A Crowd ए क्राऊड् = जमाव

(२) **क्रियापद** किंवा **व्हर्ब्** (Verb)

क्रिया दाखविणारा शब्द म्हणजे **क्रियापद**. उदाहरणार्थ:—

1 To come टु कम् = येणे
2 To read टु रीड = वाचणे
3 To write टु राइट् = लिहिणे

(३) सर्वनाम किंवा प्रोनाऊन् (Pronoun)

एकाच नामाचा वारंवार उल्लेख होऊ नये म्हणून त्या नामाऐवजी वापरला जाणारा शब्द म्हणजे सर्वनाम होय. उदाहरणार्थ :—

1 I आय् (नेहमी कॅपिटल) = मी
2 He ही = तो
3 They दे = ते, त्या किंवा ती

(४) विशेषण किंवा ॲड्जेक्टिव्ह (Adjective)

नामाच्यासंबंधी अधिक माहिती सांगणारा किंवा त्याच्या अर्थात भर घालणारा व म्हणूनच त्याच्या निदर्शनशक्तीस मर्यादित करणारा शब्द म्हणजे विशेषण होय. उदाहरणार्थ :—

1 Good गुड् = चांगला
2 Bad बॅड् = वाईट
3 Tall टॉल् = उंच

(५) क्रियाविशेषण किंवा ॲड्व्हर्ब् (Adverb)

जे काम कोणतेही विशेषण नामाच्या किंवा सर्वनामाच्या बाबतीत करते तेच काम क्रियाविशेषण क्रियापदासंबंधी, विशेषणासंबंधी किंवा दुसऱ्या क्रियाविशेषणासंबंधी करते. उदाहरणार्थ :—

1 Slowly स्लोली = हळूहळू
2 Really रिअली = खरोखर
3 Very fast व्हेरी फास्ट= अतिशय जलद

(६) उभयान्वयी अव्यय किंवा कंजंक्शन (Conjunction)

दोन शब्द किंवा वाक्यांश किंवा लहान लहान वाक्ये जोडणारा जो शब्द त्याला उभयान्वयी अव्यय असे म्हणतात. उदाहरणार्थ :—

1 If इफ् = जर
2 But बट् = परंतु
3 And अँड् = आणि

(७) शब्दयोगी अव्यय किंवा प्रेपोझिशन् (Preposition)

नामांचा किंवा सर्वनामांचा संबंध वाक्याशी जोडणाऱ्या शब्दांना शब्दयोगी अव्यय असे म्हणतात. उदाहरणार्थ :—

1 In इन् = आत
2 On ऑन् = वर
3 Near निअर= जवळ

आणि आता—शेवटचा प्रकार

(८) केवलप्रयोगी अव्यय किंवा इंटर्जेक्शन् (Interjection)

भावनातिरेकामुळे, माणसाच्या तोंडून एकाएकी निघणाऱ्या उद्गारवाचक शब्दांना केवलप्रयोगी अव्यय असे म्हणतात. उदाहरणार्थ :—

1 Alas ! अलास् = अरेरे !
2 Hallo ! हलो = अरे वा !
3 Bravo ! ब्राव्हो = शाबास !

धडा तिसरा

नाम—अधिक विचार

नामांचे एकूण प्रकार पाच.

1 A Proper Noun (ए प्रॉपर नाऊन) विशेषनाम
2 A Common Noun (ए कॉमन नाऊन) सामान्यनाम
3 A Collective Noun (ए कलेक्टीव्ह नाऊन) समुदायवाचक नाम
4 A Material Noun (मटेरिअल नाऊन) पदार्थवाचक नाम
5 An Abstract Noun (ॲन ॲबस्ट्रॅक्ट नाऊन) भाववाचक नाम

या प्रत्येकाची काही उदाहरणें पाहू.

(1) A Proper Noun (**विशेषनाम**)

जसे:—(१) **Dilip** was a king (दिलीप वाज ए किंग) दिलीप हा एक राजा होता.

(२) **The Ganges** is a sacred river (दि गॅंजेस् इज ए सेक्रेड रिव्हर) 'गंगा' ही पवित्र नदी आहे.

वरील वाक्यांतील **दिलीप** किंवा **गंगा** ही विशेषनामे होत.

(2) A Common Noun (**सामान्य नाम**)

जसे :— वरील वाक्यातील **राजा** किंवा **नदी** ही सामान्य नामे होत.

(3) A Collective Noun (**समुदायवाचक नाम**)

जसे :— A herd of cattle is grazing (ए हर्ड ऑफ कॅट्ल् इज ग्रेझींग) गायीगुरांचा **कळप** चरत आहे.

या वाक्यातील **कळप** (herd) हा शब्द समुदायवाचक आहे.

(4) A Material Noun (**पदार्थवाचक नाम**)

जसे :— Grow more corn (ग्रो मोअर कॉर्न) अधिक **धान्य** पिकवा. यातील **धान्य** हा शब्द पदार्थवाचक नामाचे उदाहरण होय.

(5) An Abstract Noun (**भाववाचक नाम**)

जसे :— Honesty is the best policy (ऑनेस्टी इज दि बेस्ट पॉलिसी) प्रामाणिकपणा हा सर्वोत्तम गुण होय.

इथे **प्रामाणिकपणा** हे भाववाचक नाम.

नामाचे वचन Noun-Number (नाऊन नम्बर)

इंग्रजीमध्ये शब्दांचे अनेकवचन पुढीलप्रमाणे केले जाते.

(१) सर्वसाधारणपणे इंग्रजीमध्ये असेच शब्द आहेत की, ज्यांच्यापुढे 'S' (एस्) हे अक्षर ठेवून त्याचे अनेकवचन साधले जाते.

जसे :— (i) Boy (बॉय्) = (एक) मुलगा
Boys (बॉय्ज्) = (एकापेक्षां अधिक) मुलगे
(ii) Bird (बर्ड्) = (एक पक्षी)
Birds (बर्ड्ज्) = (अनेक) पक्षी

(२) अनेकवचन करण्याचा इंग्रजीतील दुसरा प्रकार म्हणजे **शब्दाच्या अखेरीस** 'es' (इ एस) ही दोन अक्षरे जोडणे. मात्र ज्या शब्दाच्या शेवटी मूळचाच एस् (s), एक्स् (x), एस् एच् (sh) किंवा सी एच् (ch) असतो, अशाच शब्दांचे अनेकवचन याप्रमाणे होऊ शकते. उदाहरणार्थ :—

(i) Class (क्लास्) = (एक) वर्ग
Classes (क्लासेस्) = (अनेक) वर्ग
(ii) Fox (फॉक्स्) = (एक) कोल्हा
Foxes (फॉक्सेस्) = (अनेक) कोल्हे
(iii) Bush (बुश) = (एक) झुडुप
Bushes (बशेस्) = (अनेक) झुडपे
(iv) Bench (बेंच) = (एक) बाक
Benches (बेंचेस्) = (अनेक) बाक

(३) जर एखादा शब्द Y ह्या अक्षराने संपत असेल आणि त्या Y च्या अगोदरचे अक्षर व्यंजन असेल तर त्या शब्दाचे अनेकवचन करतेवेळी Y चा I होतो व पुढे es ही अक्षरे येतात. उदाहरणार्थ :—

(i) Army (आर्मी) = सैन्य
Armies (आर्मीज्) = सैन्ये
(ii) Duty (ड्यूटी) = कर्तव्य
Duties (ड्यूटीज्) = कर्तव्ये

परंतु y च्या अगोदर एखादा स्वर असेल तर मात्र त्या शब्दाचे अनेकवचन y च्या पुढे s हे अक्षर जोडूनच होते.

जसे :— (i) Day (डे) = दिवस
Days (डेज्) = अनेक दिवस
(ii) Ray (रे) = किरण
Rays (रेज्) = अनेक किरणे

(४) जर एखादा नामवाचक शब्द 'f' किंवा 'fe' ह्या अक्षरांनी संपत असेल तर त्या शब्दाचे अनेकवचन करतेवेळी f किंवा 'fe' ही अक्षरे ves मध्ये बदल पावतात.

जसे :— (i) Wife (वाइफ्) = पत्नी
Wives (वाइव्ज्) = अनेक पत्नी
(ii) Wolf (वुल्फ) = लांडगा
Wolves (वुल्वूज्) = लांडगे

(iii) Calf (काफ्) = वासरू
Calves (काव्ज्) = वासरे
(iv) Thief (थीफ्) = चोर
Thieves (थीव्ज्) = अनेक चोर

अपवाद :— वरील नियमांना काही अपवादही आहेत. कसे ते पहा.

	एकवचन		अनेकवचन
(i) Tooth	(टूथ) = दात	Teeth	(टीथ) = अनेक दात
Foot	(फूट) = पाय	Feet	(फीट) = अनेक पाय
Goose	(गूज) = राजहंस	Geese	(गीज) = अनेक राजहंस
Man	(मॅन्) = माणूस	Men	(मेन्) = माणसे
Woman	(वुमन्) = स्त्री	Women	(विमेन्) = स्त्रिया
Mouse	(माऊस्) = उंदीर	Mice	(माइस्) = अनेक उंदीर

अपवादातील दुसरा प्रकार पहा :—

Ox	ऑक्स = बैल	Oxen	ऑक्सन् = अनेक बैल
Child	चाइल्ड = मूल	Children	चिल्ड्रन् = मुले
Brother	ब्रदर = भाऊ	Brethren	ब्रेद्रेन = अनेक भाऊ

तिसऱ्या अपवादामध्ये पुढील शब्दांची दोन्ही वचने सारखीच

Deer	डीअर = हरिण	Deer	डीअर = हरण
Sheep	शीप् = मेंढी	Sheep	शीप् = मेंढ्या
Fish	फीश = मासा	Fish-Fishes	फीश-फीशेस = मासे
Swine	स्वाइन् = डुक्कर	Swine	स्वाइन् = डुक्कर
Dozen	डझन = डझन	Dozen / Dozens	डझन / डझन्स = डझन
People	पीपल = लोक	People	पीपल = अनेक लोक
Fruit	फ्रुट = फळ	Fruit	फ्रुट = फळे

मात्र, Fish, Dozen, Peop'e, Fruit इत्यादि शब्दांचे अनेकवचन Fishes, Dozens, Peoples, Fruits असेही होते. पण त्या त्या वस्तूंचे वेगवेगळे प्रकार असतील तरच. उदाहरणार्थ :—

अनेक तऱ्हांचे लोक = Peoples पीपल्स्
,, ,, मासे = Fishes फिशेस्

धडा चवथा

नामाचा लिंगविचार

Noun-Gender (नाऊन जेन्डर)

इंग्रजीमध्ये नामांची चार लिंगे संभवतात. (१) पुल्लिंग (२) स्त्रीलिंग (३) नपुंसकलिंग व (४) सामान्यलिंग.

इंग्रजीमध्ये लिंगाला Gender (जेन्डर) असे म्हणतात. त्यावरून वरील चार लिंगाना पुढील नावे आहेत.

(1) Masculine Gender (मॅस्क्युलिन जेन्डर) = पुल्लिंग
(2) Feminine Gender (फेमिनाइन जेन्डर) = स्त्रीलिंग
(3) Neuter Gender (न्यूटर जेन्डर) = नपुंसकलिंग
(4) Common Gender (कॉमन जेन्डर) = सामान्यलिंग)

पुरुष जातीच्या नामवाचक शब्दांना 'पुल्लिंगी', स्त्री जातीच्या नामवाचक शब्दांना 'स्त्रीलिंगी' व निर्जीव वस्तूंना 'नपुंसकलिंगी' शब्द मानतात.

परंतु या व्यतिरिक्त भाषेमध्ये असेही काही नामवाचक शब्द असतात की ज्यांचे लिंग संदर्भावरून ओळखले जाते. कारण असे शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी-दोन्ही प्रकारच्या नामांना 'सामान्य' असतात.

या सर्व लिंगांची उदाहरणे पुढीलप्रमाणे :—

(1) Masculine Gender (पुल्लिंगी)

Man मॅन = पुरुष किंवा Boy बॉय = मुलगा

Father फादर = वडील किंवा Uncle अंकल = काका

(2) Femine Gender (स्त्रीलिंगी)

Woman वुमन = बाई किंवा Girl गर्ल = मुलगी

Mother मदर = आई किंवा Aunt आँट = काकी

(3) Neuter Gender (नपुंसकलिंगी)

House हाऊस = घर Stone स्टोन = दगड

Leaf लीफ् = पान Field फील्ड = शेत

(4) Common Gender (सामान्य लिंग)

Child चाइल्ड = मूल (मुलगा–मुलगी)

Baby बेबी = लहान मूल (,, ,,)

Teacher टीचर = शिक्षक (पुरुष किंवा स्त्री)

Orphan ऑर्फन् = निराधार मूल (पोरका किंवा पोरकी)

नामांचा विभक्तीविचार

Noun–Case (नाऊन केस)

विभक्ती किंवा Case (केस)

इंग्रजी भाषेमध्ये प्रमुख विभक्त्या तीन मानल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे—

(1) The Nominative (दी नॉमिनेटिव्ह) प्रथमा

(2) The Accusative (दी अॅक्युजेटिव्ह) द्वितीया

(3) The Possesive (दी पझेसिव्ह) षष्ठी

यापैकी पहिली विभक्ती ही कर्त्यांची, दुसरी कर्मांची व तिसरी संबंधदर्शक होय.

The hunter chases the tiger (दी हंटर चेजीस दि टायगर) शिकारी वाघाचा पाठलाग करतो.

या वाक्यात hunter (हंटर) शिकारी या शब्दाची प्रथमा विभक्ती

आहे; तसेच tiger (टायगर) वाघ या शब्दाची द्वितीया विभक्ती आहे. कारण पहिला शब्द Hunter हा कर्ता असून दुसरा शब्द Tiger हे त्याचे कर्म आहे.

यावरून हे ध्यानात येईल की, प्रथमा व द्वितीया या विभक्त्यांस इंग्रजीमध्ये प्रत्यय नाहीत. उलट तेथे वाक्यातल्या कार्यावरून त्या त्या शब्दाची विभक्ती ठरते.

शब्दयोगी अव्ययांपुढे येणाऱ्या नामांची व सर्वनामांची इंग्रजीत द्वितीया विभक्तीच समजतात.

जसे :— I went before Ramesh (आय् वेंट बिफोर रमेश) किंवा Dilip went to the Garden (दिलीप वेंट टु दि गार्डन) म्हणजे– मी रमेशपूर्वी गेलो किंवा दिलीप बागेत गेला.

या वाक्यात 'रमेश' आणि 'गार्डन' या नामांच्या मागे अनुक्रमे 'बिफोर' व 'टु' ही शब्दयोगी अव्यये आली आहेत. म्हणून 'रमेश' व 'गार्डन' हे शब्द द्वितीयेत आहेत.

वरील उदाहरणांवरून आपल्या लक्षांत आलेच असेल की, कर्ता हा नेहमी प्रथमेत असतो व कर्म द्वितीयेत.

षष्ठी विभक्ती मात्र नामाला 's (Appostrophe's अॅपास्ट्रॉफी एस्) प्रत्यय लावून करतात. उदाहरणार्थ :—

That is Meena's doll (दॅट् इज् मीनाज डॉल) म्हणजे ती मीनाची बाहुली आहे.

या वाक्यात 'मीना' ह्या नामाच्या पुढे 's (अॅपॉस्ट्रॉफी एस्) लावलेला आहे व त्याची 'षष्ठी' किंवा 'पझेसिव्ह केस' (Possesive Case) साधलेली आहे.

षष्ठी विभक्ती साधण्याचे आणखी काही नियम आहेत ते पुढीलप्रमाणे :—

(१) प्राण्यांच्या नामांना 's (अॅपॉस्ट्रॉफी एस्) लावतात. उदाहरणार्थ A bird's nest (ए बर्डस् नेस्ट) पक्षाचे घरटे.

किंवा The teacher's coat (दि टिचर्स कोट) गुरुजींचा अंगरखा.

(२) ज्या नामांच्या अनेकवचनांना मुळातच 'एस्' प्रत्यय लावलेला असेल त्यांची षष्ठी विभक्ती करतेवेळी नुसती स्वल्पविरामाची खूण (Appostrophe) लावतात. अधिक 'एस्' जोडीत नाहीत.

उदाहरणार्थ:— The boys' books (दि बॉयूज बुक्स) त्या मुलांची पुस्तके. किंवा Birds' nests (बर्ड्स् नेस्ट्स्) पक्ष्यांची घरटी.

(३) अप्राणीवाचक नामांची षष्ठी, त्यांच्या पाठीमागे of (ऑफ = चा, ची, चे) हे शब्दयोगी अव्यय जोडून करतात.

उदाहरणार्थ:— The nib of the pen (दि निब् ऑफ दि पेन) लेखणीचे टोक. किंवा The library of books (दि लायब्ररी ऑफ बुक्स) ग्रंथांचे आगर (ग्रंथालय) किंवा Walls of the house (वॉल्स ऑफ दि हाऊस) घराच्या भिंती.

धडा पाचवा

उपपद विचार

जे. जी. नेस्फील्ड या विद्वान व्याकरणज्ञाच्या मते ए, ॲन् व दि (A, An व The) ही उपपदेदेखील विशेषणांचाच एक भाग होत. त्यापैकी 'The' (दि) हे निश्चितार्थबोधक उपपद असून A व An (ए व ॲन) ही अनिश्चित उपपदे होत. कारण 'दि' ह्या उपपदाने कोणत्यातरी एका निश्चित वस्तुचा बोध होत असतो. तर दुसरी दोन्ही उपपदे ही एकाच जातीच्या सर्व प्राण्यांना किंवा वस्तूंना उद्देशून वापरली जातात. उदाहरणार्थ:— This is a boy (धिस् इज् ए बॉय्) म्हणजे हा मुलगा आहे. (कोणताही 'एक' मुलगा) या उलट This is the boy who met me yesterday (धिस् इज् दि बॉय् हू मेट मी येस्टर्डे) म्हणजे मला काल भेटलेला मुलगा तो हाच. (कोणताहि एक मुलगा नव्हे. विशिष्ट असा एक मुलगा.)

व्यंजनाने सुरुवात होणाऱ्या शब्दाच्या प्रारंभी (A) 'ए' हे उपपद तर स्वराने प्रारंभ होणाऱ्या शब्दाच्या सुरुवातीस (An) 'ॲन' हे उपपद वापरतात.

जसे :— A dog ए डॉग = कुत्रा
A girl ए गर्ल = मुलगी
A man ए मॅन = मनुष्य
व An Aeroplane ॲन एरोप्लेन = विमान
An Ant ॲन ॲण्ट = मुंगी
An Orange ॲन ऑरेंज = संत्रे

अर्थात् इथेही काही अपवाद आहेतच. ते नीट ध्यानात ठेवले पाहिजेत. असे अपवाद पुढीलप्रमाणे —

1 An hour ॲन अवर = एक तास
2 A university ए युनिव्हर्सिटी = विद्यापीठ

पहिल्या उदाहरणात प्रारंभी व्यंजन असले तरी 'एच'चा तिथे उच्चार न होता 'O' (ओ) चा उच्चार होतो म्हणून 'ॲन' हे उपपद योजतात. तर 'युनिव्हर्सिटी' या शब्दात प्रारंभी 'यू' हा स्वर असला तरी त्याचा उच्चार 'Y' च्या उच्चाराप्रमाणे होतो. म्हणून तेथे 'A' हे उपपद योजतात.

The (दि) हे उपपद म्हणजे this, that, these किंवा those ह्या निश्चिततावाचक सर्वनामांचा अल्पाकार (short-form शॉर्ट-फॉर्म होय. तर (A) ए व (An) ॲन ही उपपदे One (वन्) ह्या शब्दाचे अल्पाकार (शॉर्टफॉर्म) होत. म्हणून नेस्फील्डच्या मते ती सर्व विशेषणांचाच एक प्रकार मानली पाहिजेत.

'ए', 'ॲन' व 'दी' बद्दल अधिक माहिती

A व An ही उपपदे एकवचनी सामान्यनामाबरोबर वापरतात. परंतु हे सामान्यनाम जेव्हां अत्यंत विस्तृत अशा अर्थी वापरतात तेव्हां त्यास उपपद लावीत नाहीत.

जसे:—Man is mortal (मॅन् इज् मॉर्टल) मनुष्य (प्राणी) हा मर्त्य आहे.

अनेकवचनी सामान्यनामे जेव्हा एखाद्या विशिष्ट गोष्टीला अनुलक्षून नसतात तेव्हादेखील त्यांना कोणत्याही उपपदाची जरूरी भासत नाही.

जसे :—Hens give eggs (हेन्स गीव्हज एग्ज्) कोंबड्या अंडी देतात.

परंतु 'दि' (the) हे उपपद निश्चितीदर्शक उपपद आहे म्हणून अगोदरच माहीत असलेल्या किंवा ज्याच्याबद्दल पूर्वीच बोलणे झाले आहे अशा वस्तू किंवा व्यक्ती दाखविण्याकरिता the **या उपपदाची जरूरी असते.**

जसे :—My brother gave me a book (माय ब्रदर गेव्ह मी अ बुक) माझ्या भावाने मला एक पुस्तक दिले.

The book is lost (दि बुक इज लॉस्ट) ते पुस्तक हरवले.

'The' चा दुसरा उपयोग

जगातील एकुलत्या एक गोष्टीचा उल्लेख करण्यासाठी 'दि' ह्या उपपदाचा उपयोग करतात. उदाहरणार्थ :—

The sun (दि सन्) = सूर्य
The moon (दि मून्) = चंद्र
The earth (दि अर्थ) = पृथ्वी
The sky (दि स्काय) = आकाश

'The' चा तिसरा उपयोग

एकवचनी नाम जेव्हा समग्र वर्ग किंवा जात दाखविते तेव्हा त्या नामाला उपपद लावतात. उदाहरणार्थ :—

The tiger is cruel (दि टायगर इज क्रुएल) वाघाची जात क्रूर असते.

'The' चा चवथा उपयोग

नामासारखा उपयोग केलेली विशेषणे जेव्हा एखादा समग्र वर्ग दाखवतात तेव्हाही हे उपपद वापरतात. उदाहरणार्थ :—

The rich should help the poor (दि रिच् शूड हेल्प दि पूअर) श्रीमंतांनी गरीबांना मदत करावी.

'The' चा पाचवा प्रयोग

विशेषणाचा 'तम'वाचक भाव (superlative degree) सांगत असता the चा उपयोग करतात. मात्र संबंधी **विशेषणाच्या पुढे** the **वापरीत नाहीत.** उदाहरणार्थ :—

He is the cleverest boy in the class (ही इज दि क्लेव्हरेस्ट बॉय इन् दि क्लास) तो वर्गातील सर्वांत हुशार मुलगा आहे.

परंतु— He is my best friend (ही इज् माय् बेस्ट फ्रेंड) तो माझा सर्वांत चांगला मित्र आहे.

The चा आणखी एक उपयोग

क्रमवाचक विशेषणांपूर्वी the हे उपपद वापरतात.

जसे— She is the first girl to sing (शी इज् दि फर्स्ट गर्ल टु सिंग) गाणाऱ्यांमध्ये ती पहिली मुलगी आहे.

परंतु— My first lesson is done (माय फर्स्ट लेसन इज् डन्) 'माझा पहिला धडा झाला आहे' असे म्हणतात.

धडा सहावा

क्रियापद विचार

Verbs (व्हर्ब्स्)

कर्त्याकडून विशिष्ट क्रिया घडविली गेली हे जो शब्द दाखवतो त्याला व्याकरणामध्ये **क्रियापद** असे म्हणतात. क्रियापदाला इंग्रजीत Verb (व्हर्ब) असे म्हणतात. इंग्रजीमध्ये क्रियापदांचे तीन प्रकार मानले आहेत.

(१) Transitive Verbs (ट्रॅन्झिटिव्ह व्हर्ब्स्) = सकर्मक क्रियापदे
(२) Intransitive Verbs (इंट्रॅन्झिटिव्ह व्हर्ब्स्) = अकर्मक क्रियापदे
व (३) Auxiliary Verbs (ऑक्झिलिअरी व्हर्ब्स्) = सहाय्यक क्रियापदे

To drink टु ड्रिंक = पिणे, To read टु रीड = वाचणे,

To see टु सी = पाहणे **ही पहिल्या प्रकारची उदाहरणे.**

To go टु गो = जाणे To come टु कम् = येणे

To swim टु स्विम = पोहणे **ही दुसऱ्या प्रकारची उदाहरणे** तर

Shall शॅल, Will विल्, Can कॅन्, Have हॅव्, May मे व Must मस्ट **ही तिसऱ्या प्रकारची म्हणजे सहाय्यक क्रियापदांची उदाहरणे होत.**

क्रियापदांचे काळ

Tenses (टेन्सिस्)

वर्तमानकाळ, भूतकाळ व भविष्यकाळ हे तीन प्रमुख काळ होत. त्यांनाच इंग्रजीमध्ये Present tense प्रेझेण्ट टेन्स्, Past Tense पास्ट टेन्स व Future Tense फ्युचर टेन्स् असे म्हणतात.

इंग्रजीतील अत्यंत महत्त्वाची व नेहमीच्या उपयोगांतील To be टु बी = (असणे), To have टु हॅव् = (च्या जवळ असणे) व To do टु डू = (करणे) ही तीन क्रियापदे आपण ह्या तीन काळामध्ये चालवूनच पाहू.

To be **टु बी = असणे**

वर्तमानकाळ (Present Tense)

एकवचन	अनेकवचन
I am आय् ॲम् = (मी आहे)	We are वुई आर = (आम्ही आहो)
You are यू आर = (तू आहेस)	You are यू आर = (तुम्ही आहात)
He, She, It, is ही, शी, इट् इज् = (तो, ती, ते आहे)	They are दे आर = (ते, त्या, ती आहेत)

भूतकाळ Past Tense

I was आय् वाज् (मी होतो)	We were वुई वेअर् (आम्ही होतो)
You were यू वेअर् (तू होतास)	You were यू वेअर् (तुम्ही होता)
He / She / It } was वाज् — होता / होती / होते	They were दे वेअर् (ते, त्या, ती होते, होत्या, होती)

भविष्यकाळ Futur Tense

I shall be आय् शॅल् बी = मी असेन	We shall be वुई शॅल् बी = आम्ही असू
You will be यू विल् बी	You will be यू विल् बी
He / She / It } will be ही शी इट् विल् बी तो, ती, ते असेल	They will be दे विल् बी = ते, त्या, ती असतील

आता To have हे क्रियापद चालवू.

वर्तमानकाळ (Present Tense)

I have आय् हॅव् = मजजवळ आहे	We have वुइ हॅव् = आमच्याजवळ आहे
You have यू हॅव् = तुझ्याजवळ आहे	You have यू हॅव् = तुमच्याजवळ आहे
He / She / It has ही शी इट् = त्याच्या, तिच्या, त्याच्याजवळ आहे	They have दे हॅव् = त्यांच्याजवळ आहे.

भूतकाळ Past Tense

I had अय् हॅड्	We had वुइ हॅड्
You had यू हॅड्	You had यू हॅड्
He, She, It had ही, शी, इट् हॅड्	They had दे हॅड्

भविष्यकाळ Future Tense

I shall have आय् शॅल् हॅव्	We shall have वुइ शॅल् हॅव्
You will have यू विल् हॅव्	You will have यू विल् हॅव्
He, She, It will have ही, शी, इट् विल् हॅव्	They will have दे विल् हॅव्

आता Do = करणे हे क्रियापद तिन्ही काळात चालवू.

वर्तमानकाळ Present Tense

I do आय डू = (मी करतो)	We do वुइ डू = (आम्ही करतो)
You do यू डू = (तू करतोस)	You do यू डू = (तुम्ही करता)
He / She / It does ही, शी, इट् डज् (तो, ती, ते करतो, ते)	They do दे डू = (ते, त्या, ती करतात)

भूतकाळ Past Tense

I did आय् डीड्	We did वुइ डीड्
You did यू डीड्	You did यू डीड्

He She It	did ही, शी, इट् डीड्	They did दे डीड्

भविष्यकाळ Future Tense

I shall do आय् शॅल् डू	We shall do वुइ शॅल् डू
You will do यू विल् डू	You will do यू विल् डू
He / She / It — will do ही, शी, इट विल् डू	They will do दे विल् डू

याप्रमाणे 'do' डू च्या ऐवजी अन्य कोणतेही क्रियापद चालवून दाखविता येते.

जसे :—I go आय् गो — We go वुइ गो वर्तमानकाळ

I went आय् वेन्ट — We went वुइ वेन्ट भूतकाळ

I shall go आय् शॅल् गो We shall go वुइ शॅल् गो भविष्य

याचप्रमाणे अन्यपुरुषी !

वरील उदाहरणांवरून पुढील गोष्टी आपल्या ध्यानात येतील.

(१) भूतकाळ करताना इंग्रजीत सामान्यतः क्रियापदाला ed प्रत्यय लागतो. उदाहरणार्थ : To walk (टु वॉक) = चालणे याचा भूतकाळ walked (वॉक्ड) = चालला, ली, ले.

To play टु प्ले = खेळणे

Played प्लेड = खेळला, ली, ले

(२) क्रियापदाच्या शेवटी जर 'e' असेल तर फक्त 'd' प्रत्यय लागतो. उदाहरणार्थ :

To like टू लाइक् = आवडणे

Liked लाइक्ड् = आवडला, ली, ले

(३) क्रियापदाच्या शेवटी व्यंजन असून त्याच्यामागे एकच स्वर असेल तर ed प्रत्यय लावताना शेवटचे अक्षर दोनदा येते.

उदाहरणार्थ :—

To hop   टु हॉप् = उडी मारणे
Hopped   हॉप्ड्   = उडी मारली
To permit   टु परमिट = परवानगी देणे
Permitted परमिटेड् = परवानगी दिली

(४) क्रियापदाच्या शेवटी Y असेल तर भूतकाळ होत असता त्या y चा i होतो. उदाहरणार्थ :—

To cry   टु क्राय = रडणे
Cried   क्राइड् = रडला, ली, ले
To try   टु ट्राय = प्रयत्न करणे
Tried ट्राइड् = प्रयत्न केला

पण Y च्या मागे स्वर असेल तर मात्र y चा i होत नाही. उदाहरणार्थ वर पाहिलेली क्रियापदें.

To play   टु प्ले = खेळणे
Played प्लेड   = खेळला, ली, ले
To stay   टु स्टे = राहणे
Stayed स्टेड = राहिला, ली, ले

(५) काही क्रियापदांचे भूतकाळ अनियमितपणे होतात; उदाहरणार्थ :—

To say टु से = म्हणणे	Said सेड् = म्हटले
To eat टु इट् = खाणे	Ate एट् = खाल्ले
To stand टु स्टँड = उभे रहाणे	Stood स्टूड = उभी राहिली
To get टु गेट् = मिळणे	Got गॉट = मिळाला
To buy टु बाय् = विकत घेणे	Bought बॉट् = विकत घेतले

(३) काही क्रियापदांची रूपे मात्र भूतकाळी देखील वर्तमानकाळी रूपांप्रमाणेच राहातात.

अशी ' हट्टी ' क्रियापदे ही :—

वर्तमानकाळ	भूतकाळ	
To cut टु कट् = कापणे	Cut	कट् = कापला, ली, ले
To hit टु हिट् = मारणे	Hit	हिट् = मारला
To put टु पुट् = ठेवणे	Put	पुट् = ठेवला ली, ले
To shut टु शट् = बंद करणे	Shut	शट् = बंद केला, ली, ले
To spread टु स्प्रेड = पसरणे	Spread	स्प्रेड् = पसरला, ली, ले

जाता जाता हेही लक्षात ठेवावे की, ज्या क्रियापदांचे भूतकाळ ed प्रत्यय लागून होतात त्यांना weak conjugation (वीक कन्जुगेशन) किंवा Regular (रेग्युलर) Verbs (व्हर्ब्स्) म्हणजे नियमित क्रियापदे असे म्हणतात व ज्यांची भूतकाळी रूपे अनियमितपणे होतात, त्यांना Strong conjugation (स्ट्राँग कन्जुगेशन) किंवा Irregular (इरेग्युलर) Verbs (व्हर्ब्स्) अनियमित क्रियापदे असे म्हणतात.

तसेच भविष्यकाळ करतांना आपण shall व will असे दोन प्रत्यय वापरले. सामान्यतः shall (शॅल्) हा प्रत्यय प्रथम पुरुषी दोन्ही वचनी आणि will (विल्) हा प्रत्यय द्वितीय व तृतीय पुरुषी दोन्ही वचनी वापरतात. मात्र एखाद्या क्रियेवर जोर देऊन बोलावयाचे असेल तर प्रत्यय उलट वापरले जातात व त्याद्वारे निश्चय व्यक्त केला जातो.

जसे :— I will go (आय् विल् गो) मी जाईनच.
He shall speak (ही शॅल स्पीक्) तो बोलेलच.

मुख्य क्रियापदांची रूपे करतांना आपण काही अन्य क्रियापदांची मदत घेतली. जी क्रियापदे दुसऱ्या क्रियापदांना मदत करण्याचे काम करतात त्यांना सहाय्यकारी क्रियापदे असे म्हणतात. इंग्रजीत त्यांना Auxiliary (ऑक्झिलिअरी) असा शब्द आहे. वरीलपैकी to be, to have, to do ही सहाय्यकारी क्रियापदेच होत.

आणखी काही सहाय्यकारी क्रियापदे

Can (कॅन्) Dare (डेअर्) May (मे) Must (मस्ट) Need (नीड्) Ought (ऑट्) व Used to (युज्ड टु) ही वैगुण्य असणारी इंग्रजीतील क्रियापदे. शॅल्, विल्, हॅव् किंवा टु बी या क्रियापदाप्रमाणे यांचे कर्मदेखील मूळ क्रियापदाला सहाय्य करण्याचेच असते. म्हणून यानादेखील काहीजण सहाय्यकारी क्रियापदे (Auxiliary Verbs ऑक्झिलिअरी व्हर्ब्स्) मानतात.

या वैगुण्य असलेल्या क्रियापदांची उदाहरणे व वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :

(१) Can म्हणजे शक्य होणे किंवा शक्य असणे. या क्रियापदांचा उपयोग फक्त दोन काळातच होतो. एक वर्तमानकाळ व दुसरा भूतकाळ. याची नकारार्थी रूपे Cannot (कॅन्नॉट्) किंवा Can't (काण्ट्) व Could not (कुड नॉट) किंवा Cou'd'nt (कुडण्ट).

वर्तमान काळ

उदा०:—I can swim (आय् कॅन् स्विम्) मी पोहू शकतो.

I can't swim (आय् काण्ट स्विम्) मी पोहू शकत नाही.

भूतकाळ

I could read (आय् कुड् रीड) मी वाचू शकलो.

I could not read (आय् कुड् नॉट रीड) मी वाचू शकलो नाही.

याचप्रमाणे We, You, He, She, It व They यांची रूपे होतात.

याशिवाय परवानगी देण्या-घेण्यासाठीही Can चा उपयोग करतात.

जसे:—Can I go out sir ? (कॅन् आय् गो आऊट सर ?) साहेब मी बाहेर जाऊ शकतो का ?

Yes, you can (येस् यू कॅन) होय, तुम्ही जाऊ शकता.

(२) Dare (डेअर) धाडस करणे किंवा आव्हान देणे.

उदा०:—She dare not go into the dark room (शी डेअर नॉट गो इण्टु डार्क रूम) काळोख्या खोलीत जाण्याचे तिला साहस होत नाही.

I dared him to fight (आय् डेअर्ड हिम् टु फाइट) मी त्याला लढण्याचे आव्हान दिले.

(३) May (मे) परवानगी मागणे–देणे–आशीर्वादार्थी वगैरे. May या क्रियापदाचा भूतकाळ Might असा होतो. याचे निरनिराळे उपयोग पुढीलप्रमाणे—

(१) May I come in ? (मे आय् कम् इन) — विनंती
मी आत येऊ का ?

(२) Yes, you may (येस् यू मे) — परवानगी
हो, तुम्ही येऊ शकता.

(३) No, you may not (नो, यू मे नॉट) — मनाई
नाही, तुम्हास परवानगी नाही.

(४) He may be going away from this village.
(ही मे बी गोईंग अवे फ्रॉम धिस् व्हिलेज) — शक्यता
तो ह्या खेड्यातून जाण्याचा संभव आहे.

(५) We study that we may pass
(वुइ स्टडी दॅट वुइ मे पास) — हेतू
उत्तीर्ण होण्यासाठी आपण अभ्यास करतो.

सूचना किंवा विनंती करण्याची सभ्य तऱ्हा म्हणून कधी कधी Might (माइट) या शब्दाचा उपयोग करतात.

Seeta might like to see the zoo (सीता माइट लाइक् टु सी दि झू) प्राणीसंग्रहालय पाहण्याची सीतेला इच्छा आहे.

(४) Must (मस्ट) जोरदर्शक सर्व काळात याचा उपयोग होतो.

(i) I must go now (आय् मस्ट गो नाऊ) मला आता गेलेच पाहिजे.

(ii) I shall go if I must (आय् शॅल् गो इफ् आय् मस्ट) जरूर असेल तर मला जायलाच हवे.

(iii) I thought that I must help her (आय् थॉट दॅट आय् मस्ट हेल्प हर) मला वाटले मी त्याला मदत करायला हवी.

(५) Need (नीड) गरज असणे.

He needs some help (ही नीडस् सम् हेल्प) त्याला मदतीची गरज आहे.

(६) Ought ऑट

We ought to keep quiet (वुइ ऑट टु कीप् क्वाएट) आपण शांतता राखली पाहिजे.

(७) Used to (युज्ड टु) याचा फक्त भूतकाळी उपयोग होतो.

जसे:— He used to attend Adarsh High School (ही युज्ड टु अटेण्ड आदर्श हायस्कूल) तो आदर्श विद्यालयांत जात असे.

धडा सातवा

सर्वनाम विचार

Pronouns (प्रोनाऊन्स्)

नामाच्या उच्चार वारंवार करावा लागू नये म्हणून त्याऐवजी वापरल्या जाणाऱ्या शब्दास 'सर्वनाम' म्हणतात हे आपणास ठाऊक आहेच. सर्वनामाला इंग्रजीमध्ये Pronouns (प्रोनाऊन्स्) असा शब्द आहे. त्याचे प्रकार पुढीलप्रमाणे :—

(१) Personal Pronouns पर्सनल प्रोनाऊन्स्
= पुरुषवाचक सर्वनामे

(२) Demonstrative Pronouns डेमॉन्स्ट्रेटिव्ह प्रोनाऊन्स्
= दर्शक सर्वनामे

(३) Relative Pronouns रिलेटिव्ह प्रोनाऊन्स्
= संबंधी सर्वनामे

(४) Interrogative Pronouns इंटरॉगेटिव्ह प्रोनाऊन्स
= प्रश्नार्थक सर्वनामे

यांपैकी पुरुषवाचक सर्वनामे ही तीन प्रकारची आहेत, व ती एकवचन (Singular Number सिंग्युलर नंबर) व अनेकवचन Plural Number प्ल्यूरल नंबर) अशी दोन प्रकारे होतात.

त्यांची उदाहरणे आता पाहू. सर्वप्रथम पुरुषवाचक : —

पुरुष Person	एकवचन Singular	अनेकवचन Plural
First फर्स्ट = प्रथम	I आय् = मी	We वुइ = आम्ही
Second सेकंड = द्वितीय	Thou दाऊ You यू } तू	You यू = तुम्ही
Third थर्ड = तृतीय	He = तो She = ती It = ते	They दे = ते, त्या, ती

'Thou' दाऊ हे द्वि. पु. वाचक सर्वनाम हल्ली फारसे वापरात नाही. जुन्या इंग्रजीत मात्र त्याचा सर्रास वापर आढळतो. म्हणून 'तू' ह्या अर्थी You (यू) असा शब्द वापरला तरी चालते. नव्हे, तोच वापरावा.

पुरुषवाचक सर्वनामांची विभक्तीरूपे पुढीलप्रमाणे होतात.

	सर्वनाम	द्वितीया	षष्ठी
प्र. पुरुष	I आय्	Me मी	My माय् किंवा Mine माइन्
	मी	मला	माझा, माझी, माझे
	We वुइ	Us अस्	Our अवर किंवा Ours अवर्स
	आम्ही	आम्हाला	आमचा, आमची, आमचे
द्वि. पुरुष	You यू	You यू	Your यूवर किंवा Yours यूवर्स
	तू किंवा तुम्ही	तुला किंवा	तुझा, तुझी, तुझे
		तुम्हाला	किंवा तुमचा, तुमची, तुमचे

तृ. पुरुष	He ही	Him हिम्	His हिज्
	तो	त्याला	त्याचा, त्याची, त्याचे
	She शी	Her हर	Her हर किंवा Hers हर्स
	ती	तिला	तिचा, तिची, तिचे
	It इट्	It इट्	Its इट्स्
	ते	त्याला	त्याचा, त्याची, त्याचे
	They दे	Them देम	Their देअर किंवा Theirs देअर्स
	ते, त्या, ती	त्यांना	त्यांचा, त्यांची, त्यांचे

आता दर्शक सर्वनामे (Demonstrative Pronouns)

This (धिस्) That (दॅट्) These (डीज्) Those (डोज्) ही सर्वनामे तिन्ही लिंगास उपयोगी पडतात.

जसी :—धिस् म्हणजे हा, ही किंवा हे
दॅट् ,, तो, ती किंवा ते
डीज् ,, हे, ह्या किंवा ही
डोज् ,, ते, त्या किंवा ती

संबंधी सर्वनामे (Relative Pronouns)

Who (हु) Which (व्हिच्) या संबंधी सर्वनामांची विभक्तीरूपे पुढीलप्रमाणे :—

सर्वनाम	**प्रथमा**	**द्वितीया**	**षष्ठी**
Who हु	Who हु	Whom हुम्	Whose हुज्
Which व्हिच्	Which व्हिच्	Which व्हिच्	Whose हुज् किंवा Of which ऑफ् व्हिच्

या दोन सर्वनामांशिवाय That (दॅट्) As (ॲज्) व What (व्हॉट) यांचाही संबंधी सर्वनामे म्हणून उपयोग करतात. या सर्वांची उदाहरणे ही :—

(१) This is the girl who studies with me (धीस् इज दि गर्ल हू स्टडीज् विथ् मी) जी मजबरोबर शिकते तीच ही मुलगी.

(२) This is the way which leads to the school (धिस् इज् दि वे व्हिच् लिडस् टु दि स्कूल)

(३) This is the way that leads to the school (धिस इज् वे दॅट् लिड्स् टु दि स्कूल) अर्थ वरीलप्रमाणेच.

(४) Do as you like (डू ॲज् यू लाईक्) तुला जे आवडेल ते कर.

(५) Do what you like (डू व्हॉट् यू लाईक्) अर्थ वरीलप्रमाणेच.

प्रश्न थंक सर्वनामे

Interrogative Pronouns (इंटरॉगेटिव्ह प्रोनाऊनस्)

Who हू, Whose हूज्, Whome, What व्हॉट् व Which व्हिच्. विशेष म्हणजे या सर्वांची एकवचनी व अनेकवचनी रूपे सारखीच असतात. उदाहरणार्थ :—

(1) Who spoke ? हू स्पोक ? = कोण बोलले ?

(2) Of whome did he speak ? ऑफ् हूम् डिड् ही स्पीक ?
= तो कुणाबद्दल बोलला ?

(3) Whose book is this ? हूज् बुक इज् धिस् ?
= कुणाचे हे पुस्तक ?

(4) What did he say ? व्हॉट् डिड् ही से ?
= तो काय म्हणाला ?

(5) Among the pencils which do you like best ?
अमंग दि पेन्सिलस् व्हिच् डू यू लाइक बेस्ट ?
= त्या पेन्सिलींपैकी कोणती तुला अधिक आवडते ?

धडा आठवा

विशेषण विचार

Adjectives ॲड्जेक्टिव्ज्

विशेषण हे नामाच्या अर्थामध्यें पुढीलप्रमाणे पाच प्रकारे भर घालते.

(१) व्यक्ति किंवा वस्तूच्या परिमाणाचा बोध करून.

(२) ,, ,, ,, गुणाचा ,, ,,

(३) ,, ,, ,, वचनाचा ,, ,,

(४) कोणत्या व्यक्ति किंवा वस्तूसंबंधी बोलावयाचे आहे ते सांगून व

(५) कोणत्या तरी एकाच एक व्यक्ति किंवा वस्तूचा त्या त्या विशिष्ट प्रसंगी उल्लेख करून.

यांनाच इंग्रजीमध्यें :—

(१) Adjectives of Quantity ॲड्जेक्टिव्ज् ऑफ् क्वांण्टिटी

(२) Adjectives of Quality ॲड्जेक्टिव्ज् ऑफ् क्वॉलिटी

(३) Adjectives of Number ॲड्जेक्टिव्ह्व्ज् ऑफ् नंबर

(४) Demonstrative Adjectives डेमॉन्स्ट्रेटिव्ह ॲजेक्टिव्ज्

व (५) Distributive Adjectives डिस्ट्रिब्युटिव्ह ॲड्जेक्टिव्ज्

मराठीमध्ये सर्वसाधारणपणे यांना दोन प्रकारातच विभागले आहे. एक गुणविशेषणे व दुसरा संख्याविशेषणे.

कोणत्याही नामाचा गुण दाखविणाऱ्या शब्दाला गुणविशेषण असे म्हणतात. पुढील गुणविशेषणे पहा.

Adjectives of Quality

A fat girl ए फॅट गर्ल् = जाडी मुलगी

A thin boy ए थिन बॉय = रोड मुलगा

A cruel man ए क्रुएल मॅन = क्रूर मनुष्य

A kind lady ए काइंड लेडी = दयाळू स्त्री

साधारणपणे पुढील विशेषणांच्या जोड्या वारंवार उपयोगात आणल्या जातात.

Black	ब्लॅक	= काळा	White	व्हाइट्	= पांढरा
Long	लॉंग	= लांब	Short	शॉर्ट	= तोकडा
Wild	वाइल्ड	= रानटी	Tame	टेम	= पाळीव
Hot	हॉट	= गरम	Cold	कोल्ड	= थंड
Wet	वेट	= ओला	Dry	ड्राय	= सुका
Wrong	रॉंग	= चूक	Right	राइट	= बरोबर
New	न्यू	= नवा	Old	ओल्ड	= जुना

संख्या विशेषणे

One	वन्	= एक	Two	टू	= दोन
Three	थ्री	= तीन	Four	फोर	= चार
Five	फाइव्ह	= पाच	Six	सिक्स	= सहा
Seven	सेव्हन्	= सात	Eight	एट्	= आठ
Nine	नाइन्	= नऊ	Ten	टेन्	= दहा
Eleven	इलेव्हन्	= अकरा	Twelve	ट्वेल्व	= बारा

Thirteen थर्टीन = तेरा व याचप्रमाणे पुढे Fourteen फोर्टीन = चौदा Fifteen फिफ्टीन् = पंधरा वगैरे, Nineteen नाइन्टीन् = एकोणीसपर्यंत.

Twenty ट्वेण्टी = वीस   Twentyone ट्वेण्टीवन् = एकवीस

Twentynine ट्वेण्टीनाइन = एकोणतीस   Thirty थर्टी = तीस

याचप्रमाणे :—

Forty	फॉर्टी	= चाळीस
Fifty	फिफ्टी	= पन्नास
Sixty	सिक्स्टी	= साठ
Seventy	सेव्हण्टी	= सत्तर
Eighty	एटी	= ऐंशी
Ninety	नाइन्टी	= नव्वद
Hundred	हण्ड्रेड	= शंभर
Thousand	थाऊजण्ड	= हजार

Million मिलियन = दहा लाख
Billion बिलियन् = महा पद्म

वगैरे.

आता काही क्रमवाचक विशेषणे

The first दि फर्स्ट = पहिला
The second दि सेकण्ड = दुसरा
The third दि थर्ड = तिसरा
The fourth दि फोर्थ = चवथा
The fifth दि फिफ्थ = पाचवा
The sixth दि सिक्स्थ = सहावा
The seventh दि सेवन्थ = सातवा
The eighth दि एट्थ = आठवा
The ninth दि नाइन्थ = नववा
The tenth दि टेन्थ = दहावा
The eleventh दि इलेव्हन्थ = अकरावा
The twelvth दि ट्वेल्व्थ = बारावा
The twenty first दि ट्वेण्टीफर्स्ट = एकविसावा
The twenty second दि ट्वेण्टी सेकण्ड = बाविसाव
The forty first दि फॉर्टी फर्स्ट = एकेचाळिसावा
The forty third दि फॉर्टी थर्ड = त्रेचाळिसावा
The sixty first दि सिक्स्टी फर्स्ट = एकसष्टावा
The eighty eighth दि एटी एट्थ् = एठ्यायैंशीवा
The ninety ninth दि नाइण्टी नाइन्थ = नव्याण्णवावा
The hundredth दि हण्ड्रेड्थ = शंभरावा

काही अपूर्णांकी विशेषणे पुढीलप्रमाणे : –

Oneforth वन्फोर्थ = पाव
A quarter ए कार्टर = पाव
Onehalf वन्हाफ् = अर्धा

A half एं हाफ् = अर्धा
Three fourth थ्री फोर्थ = पाऊण

क्रियाविशेषण अव्यय Adverbs (अ‍ॅड्व्हर्ब्स)

